● गुरुवार, दि. १३ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगदंबा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# शहर विद्रुपिकरणास मनपाचा 'हातभार'

## कारवाईऐवजी एजन्सीमार्फत फलकबाजांना परवानगी देणार!

**दीपक शेळके**

**जालना** - शहरातील विविध भागात, रस्त्यावर, वीजेच्या खांबांवर, दुभाजक, जिल्हाधिकारी कार्यालय व छ, संभाजी उद्यान जवळील दादरावर, सर्वच चौफुल्यांवर फलकबाजीने बस्तान बांधले आहे. या फलकबाजीमुळे शहर विद्रुपिकरणात भर पडत आहे. गेली दोन वर्षांपासून युवा आदर्शने अनाधिकृत फलकबाजीवर अंकुश लावण्यासंदर्भात व शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्यांवर कारवाई करावी यादृष्टिने विविध वृत्त प्रकाशित केले आहे. मात्र, याचे जालना शहर महानगरपालिकेस कोणतेही सोयरसुतक नाही. उलट कारवाई ऐवजी मनपा कडुन काही एजन्सीधारकांमार्फत ही फलकबाजी अधिकृत करण्यावर भर देण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. मुळात शहर विद्रुपिकरणास मनपाच हातभार लावत असल्याचे चित्र आहे. काही एजन्सीधारकांनी मनपाकडे विदुयत खांबांवरील क्युऑस्क बोर्डसाठी मनपाकडे परवानगी मागितली असून त्यांना मनपा शहर विद्रुपिकरणात भर पाडत परवानगी देणार का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. दुसरीकडे इतके वर्ष विना परवानगी असलेले या फलकांवर आतापर्यंत कारवाई का करण्यात आली नाही याचे उत्तर मनपा प्रशासन देईल का? या गंभीर विषयाकडे जिल्हाधिकारी, पालकमंत्री लक्ष देतील का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

जालना शहर महानगर पालिका अस्तित्वात आल्यानंतर व पुर्वी नगर परिषद असतांना सन २०२१-२२, २०२२-२३, व २०२३-२४ या आर्थिक वर्षात मनपा व पालिकेने केवळ २०० फलक व ६५ किऑस्क बोर्डला मान्यता काही एजन्सीधारकांमार्फत दिलेली होती. असे असतांना आता २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी विविध एजन्सीधारकांनी मान्यतेसाठी मनपा प्रशासनाकडे १९ डिसेंबर २०२३, १६ मार्च २०२४, ८ एप्रिल २०२४, २० मे २०२४, २१ मे २०२४, २९ मे २०२४, १४ जुन २०२४, ९ जुलै २०२४, २६ जुलै २०२४, ४ सप्टेंबर २०२४, या तारखांना जाहिरात फलक लावण्याच्या ठिकाणांसह आकार, लावण्यात आले/येणार आहेत. मनपाचा कर कळविण्याबाबत पत्र दिलेले आहे. मुख्यत्वे सन २०२४-२५ साठी सात एजन्सीधारकांकडून विविध आकारांचे २०६ फलक (बॅनर्स) व ५९७ खांबांवरील किऑस्क बोर्ड विविध आकारात लावण्याकरीता मान्यतेची मागणी केलेली आहे. मनपाच्या मालमत्ता विभागाच्या माहितीनुसार अद्यापपर्यंत कोणत्याही एजन्सींना मान्यता-परवानगी देण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे काही एजन्सीधारकांनी पुरवणी मागणी पत्र मनपाला दिलेले आहे.

महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट १९९५ च्या कलम ५ अन्वये विद्रुपिकरण मोकळे करणे व संबंधीतांवर कारवाई करणे आवश्यक असतांना मनपा प्रशासनाने केवळ मागणीपत्र अन् मान्यता-परवानगीचा सोपस्कार पुर्ण करण्याची धडपड करत आहे. मुळात शहर विद्रुपिकरण रोखण्याची सर्वस्वी जवाबदारी ही शहर महानगर पालिकेची आहे. असे असतांना एजन्सीधारकांनी मागणी केल्यानंतरही अद्यापपर्यंत त्यांना मान्यता-परवानगी का देण्यात आली नाही? त्यांच्याकडून किती कर आकारणार? फलक लावण्यासंदर्भात काही नियमावली नाही का? खांबांवरील किऑस्क बोर्ड लावतांना रहदारीस अडथळा निर्माण होईल अथवा प्रवाशांचे लक्ष विचलित होऊन अपघात होतील या पद्धतीने लावण्यासाठी मनपा मान्यता - परवानगी देणार का? गेल्या दोन वर्षांपासून विद्युत खांबांवर जाहिरात फलक/ किऑस्क बोर्ड लावण्यात येत आहे. (काही नवीन झालेले अपवाद वगळता) त्यांच्यावर मनपा प्रशासन कारवाई करणार नाही का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गेल्या वर्षांपर्यंत केवळ ६५ किऑस्क बोर्डला मान्यता परवानगी दिलेली असतांना या वर्षी ५९७ किऑस्क बोर्डला मान्यतेसाठी मनपाकडे मागणी होत आहे. तर मनपा शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या अशा जाहिरात फलकांसाठी एजन्सीधारकांना परवानगी देणार का? मनपा प्रशासनाने अशी मान्यता-परवानगी दिल्यास शहर विद्रुपिकरणास भर घालण्यास मोठा हातभार लागणार यात तिळमात्र शंका नाही.

### ... तर विना परवानगी बॅनर लागतील

शहर विद्रुपिकरणास भर पडत असलेल्या जाहिरात फलक व बॅनरबाजी संदर्भात मालमत्ता विभागाचे राहुल देशमुख यांची युवा आदर्श प्रतिनिधीने समक्ष भेट घेत विचारणा केली असता एजन्सी धारकांमार्फत मागणी करण्यात आलेली असून अद्याप कुणालाही परवानगी दिली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महत्त्वाचे म्हणजे ज्यांनी मागणी केली त्या मागणीनुसार ईतर ठिकाणी लावण्यात आलेले फलक, किऑस्क बोर्ड हे अनाधिकृत समजण्यात यावे असे देखील ते म्हणाले. यावर एवढ्या मोठ्या प्रमाणात शहर भरात बॅनरबाजी होत असून त्यामुळे शहर विद्रुपिकरण होत आहे याकडे श्री देशमुख यांचे लक्ष वेधले असता जर त्यांना मान्यता-परवानगी दिली नाही तर त्या ठिकाणी विना परवानगी वाढदिवसांचे बोर्ड लागतील. असा जावाई शोध त्यांनी लावला. मुळात शहर विद्रुपिकरण रोखण्यासाठी प्रयत्न मनपा प्रशासनाने करणे आवश्यक असतांना मान्यता देण्याच्या विचारात मनपा प्रशासन आहे.

### कारवाईसाठी राजकीय दबाव?

अनाधिकृत फलकबाजींवर कारवाईसाठी मनपा प्रशासनावर राजकीय दबाव असल्याची माहिती युवा आदर्शच्या हाती लागली असून अंकुश सोनवणे यांच्या कोचिंग क्लासेसचे अतिक्रमणाचा विषय असो अथवा अनाधिकृत फलकबाजीचा यांच्यावर कारवाईसाठी आयुक्तांच्या टेबलवर फाईल जाताच त्यावर सही होण्यासाठी विलंब होत असल्याचे आता स्पष्ट होत आहे. वृत्तपत्रांतील वृत्तासह काही तक्रारदारांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मालमत्ता विभागाकडून कारवाईची प्रक्रिया पुर्ण करत असतांना या विभागालाच आयुक्तांकडून महिनाभर वेळ द्यावा असे तोंडी सुचविण्यात येते अशी माहिती पुढे आली आहे. याबाबत मालमत्ता विभागाचे राहुल देशमुख यांना विचारले असता त्यांनी यावर बोलणे टाळले. दुसरीकडे कोचिंग क्लासेसवाला स्वतः मनपा कार्यालयात एका राजकीय पदाधिकाऱ्यांस सोबत घेऊन येत कारवाई टाळण्यासाठी आग्रह करत असल्यामुळे मनपा प्रशासन कारवाई करण्यास धजत नसल्याचे स्पष्ट होत आहे. एकीकडे प्रकरण मा. लोकायुक्त यांच्या दालनात आहे. आता मनपा प्रशासन काय मा. न्यायालयात दाद मागण्याची वेळ पाहते आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. अतिक्रमण हटाव मोहिमेच्या माध्यमातून गोर-गरीबांचे अतिक्रमण हटविणारे मनपा प्रशासन राजकीय दबाव झुगारुन कारवाई करणार का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

---

युवा आदर्श

### सत्कार ...

कोण कुणाचा करे
पहावे बुवा सत्कार
काही वैफल्य ग्रस्त
टाकत राहे फुत्कार
राजकारणा घडतो
रोज नवा चमत्कार
संशयी नजरा मुजरा
करता एक नमस्कार
फक्त करता दुस्वास
कसला हा अहंकार
सकारात्मक कार्यात
का करी असहकार
समाजकारण करावे
कु प्रवृत्ती बहिष्कार
टोकाची वैर भावना
कसा असा तिरस्कार
वैयक्तिक बंध संबंध
प्रत्येकाला अधिकार
नाती जपता आपली
का करावा धिक्कार
कधी जपावे लागतात
काही भले सोपस्कार
माणूस आहोत जाणा
महत्वपूर्ण रे संस्कार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

# वाळु माफियांचा हल्ल्यांना भीक घालत नाही; चारपट जोशाने कारवाई करणार - चव्हाण

## काही पोलीसांचे अवैध वाळु चोरीला पाठबळ; आरोपाने खळबळ

**जालना । प्रतिनिधी** - वाळु माफियांनी आमच्यावर किती हल्ले केले तरी त्यांच्या हल्ल्यांना भीक घालणार नसून चारपट जोशाने अवैध वाळु उपसा - वाहतुकीवर कारवाई करणार असल्याचा ईरादा अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर काही पोलीस अधिकाऱ्यांचेच अवैध वाळु चोरीला पाठबळ असल्याचा दावा देखील श्री चव्हाण यांनी केला आहे. यामुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. ते बुधवार (दि १२) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकारांशी बोलत होते.




यावेळी तहसिलदार विजय चव्हाण म्हणाले की, पोलीस प्रशासनातील काही अधिकारी अवैध वाळु चोरीला बढावा देत आहेत. काही निवृत्त पोलीस कर्मचारी अवैध वाळु वाहतुकीची वाहने चालवतात तर काही सध्या कार्यरत पोलीस त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर अवैध वाळु वाहतुकीची वाहने चालवतात असा आरोप देखील त्यांनी केला आहे. या आरोपाने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. आमच्यावर कितीही हल्ले झाले तरी आम्ही वाळू माफीयांवर चार पट कारवाई करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# अवैध वाळू वाहतूक करणारे हायवा टेंभुर्णी पोलिसांनी केले जप्त

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - येथील टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांच्या टीमने अवैध वाहतूक करणारे हायवा जप्त करून कारवाई केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की बुधवार (दिनांक १२) रोजी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे प्रभारी सचिन खामगळ यांना बोबडेवाडी येथे कल्याण गव्हाण ते सिनगाव जहांगीर या रोड वरून एक हायवा अवैध वाळू वाहतूक करीत असल्याचे माहिती मिळाली. यावरून सकाळी दोन वाजून पन्नास मिनिटांनी छापा टाकून पंधरा लाख किमतीचे टाटा कंपनीचे पांढऱ्या रंगाची टाटा कंपनीचे व्हायवा व १८ हजार रुपये किमतीची तीन ब्रास वाळू अशी एकूण पंधरा लाख १८ हजार रुपये **पान २ वर**



# फायनान्स कंपनीला ग्राहक आयोगाचा दणका - ॲड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी** - कर्ज खाते बंद करून देखील व कोणतेही प्रकरण कर्जदारा विरुध्द प्रलंबीत नसतांना त्या संदर्भात माहिती सिबील कंपनीला माहिती न दिल्याने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग जालना यांनी ॲड. कैलाश सखाराम जाधव विरुध्द शाखा व्यवस्थापक महिंद्रा हाऊसिंग फायनान्स कंपनी या प्रकरणात फायनान्स कंपनीच्या विरोधात निर्णय देऊन त्यांना कर्ज संदर्भात योग्य माहिती सिबिल कंपनीला देणे बाबत आदेशीत केले तथा तक्रारदाराला झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासापोटी रुपये पंचवीस हजार तथा तक्रारीचा खर्च रुपये पाच हजार तीस दिवसाच्या आत देण्याचे आदेश दिले. सदर आदेशावर जिल्हा ग्राहक आयोगाच्या अध्यक्षा अर्पना काटे, सदस्य संतोष निकुले, सदस्य उदय दळवी यांची स्वाक्षरी आहे. तक्रारदाराची बाजु आयोगासमक्ष ॲड. महेश धन्नावत यांनी मांडली. या प्रकरणात तक्रारदार यांचे कर्ज खाते बंद केल्यानंतर देखील त्याच्या विरुध्द न्यायालयात प्रकरण प्रलंबीत असल्याचे सिबिल मध्ये दर्शवित होते. ग्राहक आयोगापुढे तक्रार दाखल झाल्यानंतर सुध्दा फायनान्स कंपनीने कोणतेही सुट प्रलंबीत असल्याबद्दल कोणतही माहिती आयोगा समक्ष दिली नाही. तसेच आरबीआयच्या नियमाप्रमाणे फायनान्स कंपनीने योग्य माहिती सिबिल कंपनीला देणे गरजेचे असल्याने या प्रकरणात आयोगाने फायनान्स कंपनी विरुध्द निकाल दिला. या निकालामुळे फायनान्स कंपनी योग्य माहिती सिबिल कंपनीला देतील अशी आशा ॲड. महेश धन्नावत यांनी व्यक्त केली.

# सण, उत्सवात ध्वनीची मर्यादा राखून सूट

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यात सन २०२५ मध्ये विविध धार्मिक सण, उत्सव व उपक्रम संपन्न होणार असून या सण, उत्सावाच्या काळात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाचा वापर शासन निर्णय व ध्वनी प्रदुषण (नियम व नियंत्रण) नियम २०० च्या नियम ५ (३) नूसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाचा वापर श्रोतेगृहे, सभागृह, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागेशिवाय इतर ठिकाणी ध्वनीची विहीत मर्यादा राखून चालु वर्षातील खालील सण / उत्सव व उपक्रमाच्या दिवशी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देण्यात आली असल्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.



सण, उत्सव व उपक्रमामध्ये शिवजयंती, ईद-ए-मिलाद, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, १ मे महाराष्ट्र दिन, श्रीकृष्ण जन्माष्टमी (दि. १५.०८.२०२५) अनुक्रमे एक दिवस तर गणपती उत्सवासाठी दि. २७ ऑगस्ट व ५ सप्टेंबर रोजीचे २ दिवस तसेच नवरात्री उत्सवातील नवमी आणि दिवाळीतील लक्ष्मीपूजन, ख्रिसमस, ३१ डिसेंबर रोजी, विभागीय महसूल क्रीडा स्पर्धा दि.१४ व १५ फेब्रुवारी रोजी आणि महत्वाच्या कार्यक्रमासाठी राखीव दोन दिवस अशी सुट जाहीर करण्यात आली असल्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. सण, उत्सवासाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक **पान २ वर**

# जिल्ह्यात इयत्ता बारावी परिक्षेत कॉपीचे ११ गैरप्रकार

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्य माध्यकमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत इयत्ता १२ वी परीक्षेला कालपासून सुरुवात झाली आहे. दि.११ फेब्रुवारी, २०२५ ते दि. १८ मार्च, २०२५ या कालावधीत जालना जिल्ह्यातील एकुण ८२ उपकेंद्रावर इयत्ता १२ वीच्या परीक्षा पार पडणार आहेत. राज्य शासनामार्फत १२वी बोर्डाची परीक्षा कॉपीमुक्त परीक्षा राबवण्यासाठीचे विशेष अभियान चालवले जात आहे. त्यासाठी, जिल्हा प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांनी ही या संदर्भात कठोर अमंलबजावणी करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दि. ११ फेब्रुवारी, २०२५ रोजी इंग्रजी विषयाची परीक्षा पार पडली असुन, सदर परीक्षे दरम्यान श्रीमती इंदिरा गांधी विद्यालय रामनगर सा. केंद्र क्रमांक ४१८ वर ०३ कॉपीचे गैरप्रकार, सत्य शोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव ता. भोकरदन केंद्र क्रमांक ४९२ वर ०४ कॉपीचे गैरप्रकार तर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बदनापुर केंद्र क्रमांक ४२८ वर २ कॉपीचे गैरप्रकार निदर्शनास आले.

तसेच आज (दि.१२ फेब्रुवारी) रोजी पार पडलेल्या हिंदी विषयाच्या परीक्षे दरम्यान सिध्देश्वर उच्च माध्यमिक विद्यालय ढोकसाळ मंठा ता. मंठा येथे २ कॉपीचे गैरप्रकार झाल्याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परीषद, जालना यांच्यामार्फत विभागीय सचिव विभागीय मंडळ **पान २ वर**

# संपादकीय

## कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान असून दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरम ार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले. मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला मात्र विद्यार्थी पंतप्रधानांचा हा संदेश कितपत अंमलात आणतील याबाबत शंकाच आहे कारण कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहावी बारावीच्या परीक्षेत तर कॉपीचा सुळसुळाट झालेला दिसून येतो. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉल च्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वो तोपरी प्रयत्न करतात हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पान १ व ४ वरुन

### अवैध वाळु ...

किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर पुण्यातील व्हायवाम मालक व चालक प्रदीप शिवहरी धारे वय वर्ष ३२ राहणार निमगाव गुरु तालुका देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे व त्यास अटक करून पोलीस कोठडीत आहे. सदर कामगिरीही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, माननीय पोलीस उप विभागीय अधिकारी श्री गणपत दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक रवी देशमाने, पोलीस अंमलदार हरिदास मस्के, धनंजय जगदाळे, प्रदीप धोंडगे, यांच्या टीमने केली आहे.

### सण उत्सवात ...

वापराबाबतची सुट जिल्ह्यातील शांतता क्षेत्रासाठी लागू नसून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित नगरपालिका, नगर पंचायत, स्थानिक संस्था व ध्वनी प्रदुषण प्राधिकरणाची राहील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### जिल्ह्यात इयत्ता ...

कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना सादर करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### पाणीवेस येथील ...

चकमक चालली. महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी फोनवरून पोलिसांना दम दिला मी कमिशनर आहे मी आदेश देतो तुम्हाला पण पोलिसांनी सांगितले तुम्ही लेखी तक्रार द्या त्यानंतरच आम्ही त्याच्यावर कारवाई करणार त्याशिवाय आम्ही तिला हात लावू शकत नाही अतिक्रमण धारकाने जीवाचे बरेवाईट केल्यास जबाबदार कोण असा सवाल पोलिसांनी पालिका आयुक्त समोर उपस्थित केलाय. त्यामुळे कारवाई न करता महापालिका पथक आणि पोलीस अखेर रिकाम्या हाताने माघारी फिरले.

# पायाच्या भेंगासाठी घरगुती उपाययोजना

बरेच लोक टाचेमध्ये वेदना असल्याची तक्रार करतात. ह्याचे प्रमुख कारण हिल्स घालणे देखील असू शकत. या व्यतिरिक्त टाचेच्या वेदने चे कारण वजन वाढणे, बऱ्याच काळ उभे राहणे, नवीन व्यायाम, किंवा शारीरिक क्रियाकलापांमुळे असू शकत. बऱ्याच वेळा टाचांची वेदना इतकी वाढते की पायाच्या खालच्या भागेत असह्य वेदना आणि जळजळ सुरु होते. जास्त काळ उभे राहणे, पाऊले

कडक होणे, हलकी सूज येणे, टाचेची उंची वाढणे जाणवते. केल्शियम ची कम तरता देखील टाचांच्या वेदनेचे कारण होऊ शकत. कॅल्शियम च्या कमतरतेमुळे हाडांमध्ये वेदना होते. हाडे कमकुवत होतात. टाचांच्या वेदनेपासून मुक्त होण्यासाठी आपण काही घरगुती उपाय अवलंबवू शकता. जे आपल्याला टाचेच्या वेदनेपासून मुक्तता देतात. चला तर मग जाणून घेऊ या.

**आल्याचा काढा -** आलं आरोग्याच्या दृष्टीने खूप फायदेशीर मानले आहे. आलं टाचेच्या वेदनेपासून मुक्त करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. आल्याचा काढा प्यायल्यानं टाचेच्या वेदनेपासून आणि सूज येण्यापासून आराम मिळतो.

**लवंगाचं तेल-** लवंगाच्या तेलात वेदनाशामक घटक आढळतात. लवंगाच्या तेलाने मॉलिश केल्यानं टाचांच्या वेदनेपासून आराम मिळतो. पायांमध्ये कोणत्याही प्रकारची वेदना जाणविल्यास लवंगाच्या तेलाची मॉलिश केल्यानं फायदा होतो.

**हळदीचा वापर-** हळद ही मसाल्याच्या रूपात भाजीची चव वाढविण्यासाठी वापरतात. हळदीमध्ये अँटी इंफ्लिमेंटरी गुणधर्म असतात, जे सूज कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. हळदीचं दूध प्यायल्यानं शरीराची वेदना कमी होण्यास मुक्तता मिळते.

**मोहरी-** मोहरी चे दाणे तेल



बनविण्यासाठी आणि म साल्यात फोडणी देण्यासाठी वापरले जाते. या मुळे टाचांच्या वेदने पासून देखील आराम मिळू शकतो. अर्धा वाटी मोहरी चे दाणे दळून घ्या. ह्या भुकटीला गरम पाण्याच्या बादलीत मिसळा. या पाण्यात पायांना १२ ते १६ मिनिटे घालून ठेवा असं केल्यानं टाचांच्या वेदने पासून आराम मिळतो.

# इस्तंबुल; युरोपात जाण्यासाठीचे द्वार

ग्रीक पुराणकथेतली ट्रॉय सिटी तुर्कस्तानातच तर होती. या सगळ्या ओढ लावणार्या गोष्टींमुळे तुर्कस्तान पर्यटकांच्या मनात अगदी रुतून बसत. इतिहासाच्या पुस्तकात भेटलेलं इस्तंबुल. बझेंटाइन, ग्रीक, रोमन, अरब, ऑटोमान किती जणांची राजवट या शहरानं पाहिली! किती लढ्या या शहरासाठी झाल्या त्याची नोंद इतिहासाच्या पानापानांवर लिहिली गेलेली. सुरुवातीला कॉनस्टनटिनोपाल आणि मग इस्तंबुल या नावानं अगदी १९२३ तुर्कस्तानची राजधानी म्हणून मिरवणारं हे शहर पर्यटकांना सतत खुणावत राहिलं होतं. आशिया खंडातून युरोप खंडात जाण्यासाठीचं प्रवेशद्वार म्हणून मानाचं स्थान पटकावून बसलेलं हे शहर! इस्तंबुलसाठी अतातुर्क आंतरराष्ट्रीय विम ानतळावर उतरावं लागतं. विमानतळाची भव्यता आणि आधुनिकता डोळ्यात प्रथमक्षणीच भरते. यांत्रिक आधुनिकतेनं परिपूर्ण असलेल्या या विमानतळावर जरी जगभरातून प्रवासी येत असले तरी इथल्या अनेक अधिकार्यांना पुरेसं इंग्रजी येत नव्हतं त्याचा फटका भारतीय पर्यटकांना बसतो. इस्तंबुलचा रस्ता चांगला चौपदरी आणि गुळगुळीत होता. त्याला लगटून दूरवर बाग पसरली होती. या उन्हाच्या वेळी तिथे फारसं कुणी नव्हतं, पण बागेतल्या झाडांची हिरवाई दुरूनही नजरेला थंडाई पुरवत होती, शिवाय या बागेला जवळ जवळ खेटून समुद्राची निळाई सोबत असते. टर्किश लिरा हे इथलं चलन. दोन किंवा तीन टर्किश लिरा देऊन तुम्हाला आवडेल त्या प्रमाणात किलगडाच्या फोडी किंवा फळांचे रस विकत घेऊन ते तुम्ही रस्त्यावरच उभे राहून मस्तपैकी फस्त करू शकता. टॅक्सीने काही मिनिटांत इजिप्शियन बाजारात जाऊ शकता. हा बाजार म्हणजे इथलं ओल्ड मार्केट! खूप म्हणजे खूप जुनं. अंदाजे चारशे वर्षांपूर्वीपासून इथे बाजार भरत आलेला आहे. डोक्यावर छप्पर असलेली ही एक पुराणी मंडईच वाटते. आत एक उभा जाणारा आणि एक आडवा जाणारा असे दोन रस्तेदेखील जुन्या मंडईला शोभणारे. रस्त्यांच्या दुतर्फा दुकानं. दुकानांच्या बाहेर झाडून सगळीकडे पोत्यातून अक्रोड, बदाम, पिस्ते अशा वस्तू ठेवलेल्या. त्यादेखील अगदी उगड्यावर. या दुकानांना अगदी खेटून सोन्या-चांदीचे दागिने शोकेसमध्ये विकायला ठेवलेली दुकानंही होती. अत्तराचे सुवासिक बुधले दाखवत गिर्हाईकांना हाकारणारे दुकानदार होते आणि त्याच ओळीत टर्किश डिलाइटचा खच. शोकेसमधून अगदी ऊतू जात असलेली तुर्की मिठाईची दुकानंही होती.

# प्रतिकारशक्ती वाढविण्याचे औषध अद्याप नाहिच...

छोटा अमेय घरी एकटाच असल्यामुळे नोकरीवर असलेल्या आईवडिलांनी त्याला लवकरच; म्हणजे दीड वर्षाचा झाल्या झाल्या प्ले ग्रुपमध्ये टाकलं. आई निशा ऑफिसमध्ये जातानाच सकाळी वाजता अमेयला सोडायची. थेट सायंकाळी घरी परत येताना घेऊन यायची. झालं! अमेय आजारी पडायला लागला. चिडचिड करायला लागला. दोघे माझ्याकडे आले आणि रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी औषध मागितलं. रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याचा असं काही औषध जगात कुठेही मिळत नाही! रोगप्रतिकार शक्तीविषयी पालकांना नेहमी पडणारे हे काही प्रश्न आणि त्यांच्या उत्तरांवर आज चर्चा करूया-

रोगप्रतिकार शक्ती म्हणजे काय?

रोगप्रतिकार शक्ती किंवा इम्युन सिस्टीम ही शरीराला सुरक्षित ठेवण्यासाठी एक यंत्रणा आहे. ही आपल्या शरीराचं वातावरणातील हानिकारक गोष्टींपासून संरक्षण करते. विविध बॅक्टेरिया आपल्या शरीरात शिरकाव करतात, तेव्हा ही यंत्रणा त्यांची ओळख पटवून ते नष्ट करते. विविध आजारांपासून दूर राहण्यासाठी ही यंत्रणा सक्रिय असणं खूप जरुरी आहे.

रोगप्रतिकार शक्ती कोणत्या वयात येते?

बाळ झाल्यावर आईच्या दुधातून बाळाला ॲण्टिबायोटिक्स मिळतात. या ॲलर्जी व संसर्गाशी दोन हात करतात. म्हणूनच आम्ही म्हणतो, जन्म झाल्यावर लगेच स्तनपान सुरू करा व जास्तीत जास्त; म्हणजे दीड वर्ष स्तनपान करा. बाळ साधारण सहा महिन्यांचं झाल्यावर ॲण्टिबायोटिक्स तयार करू शकतं. शरीराची प्रतिकार शक्ती पूर्णतः मूल साधारण आठ वर्षांचं झाल्यावरच तयार होते.

कमकुवत प्रतिकार शक्तीची काय लक्षणं असतात?

प्रतिकार शक्ती कमकुवत असली, तर संसर्ग पुन्हा पुन्हा होतो. जसे न्युमोनिया, ब्रॉन्कायटिस, सायनस इन्फेक्शन, कानाचा संसर्ग, त्वचेचा संसर्ग आदी. अशा मुलांना ॲनेमिया असतो. पचनशक्तीच्या समस्या पुन्हा पुन्हा उद्भवतात. अशा मुलांची शारीरिक वाढ नीट होत नाही.

लसीकरणामुळे मुलांमध्ये रोगप्रतिकार शक्ती निर्माण होते का?

लसीकरणामुळे महाभयंकर संसर्गापासून मुलांना संरक्षण मिळतं. लस कशी काम करते हे बघण्यासाठी आपण आधी समजून घेऊ की, इन्फ ेन्शन कसं होतं. जेव्हा बॅक्टेरिया किंवा व्हायरस शरीरात जातो, तेव्हा तो पेशींवर आक्रमण करतो. यावेळी त्याची संख्या कित्येक पटींनी वाढते. यालाच संसर्ग म्हटले जाते. संसर्ग झाला की आजार होतो. आता लस दिल्यामुळे काय होतं, की टी-लिम्फोसिट्स आणि ॲण्टिबॉडीज तयार होतात. त्या मग रोगप्रतिकार शक्ती निम ाण करतात. लसीकरण तुमच्या बाळाचा उत्तम हेल्थ इन्शुरन्स आहे.

नेहमीच्या जीवनात कोणत्या गोष्टींचा रोगप्रतिकार शक्तीवर परिणाम होतो?

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात ताणतणाव, जागरण, अवेळी जेवण या सगळ्या गोष्टी अगदी सामान्य झाल्या आहेत. मात्र या सगळ्यांचा कळत-नकळत मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. माणसाची जीवनशैलीच त्याचं आरोग्य ठरवते. शारीरिक आव्हानांना सामोरं जाण्यासाठी सक्षम रोगप्रतिकार शक्ती असणं फार गरजेचं आहे.

# 'गुड मॉर्निंग'च्या ठिकाणी 'शुभ प्रभात' म्हणा!

दरवर्षी मराठी राजभाषा दिन २७ फेब्रुवारीला साजरा केला जातो. संस्कृतनंतर सर्व भाषांत मराठी भाषा अधिक सात्त्विक आहे. प्रायोगिक स्तरावर प्रत्येकाने तिचे वैभव टिकवण्यासाठी कसे प्रयत्न करायला हवेत, यावर प्रस्तुत लेखात प्रकाश टाकण्यात आला आहे. 'माय मराठी'ला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मराठी भाषिकांनी संघटितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करून दृढ निश्चय करूया आणि संघटितपणे 'मराठी'चे रक्षण तसेच संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करूया. मराठी बोलताना, लिहिताना करावयाचे आपण प्रयत्न पाहूया :

'गुड मॉर्निंग'च्या ठिकाणी 'शुभ प्रभात' म्हणा !,
मुलांना 'मम्मी-डॅडी' नको, तर 'आई-बाबा' म्हणायला शिकवा !,
दूरभाषवर बोलतांना 'हॅलो' म्हणण्यापेक्षा 'नम स्कार' म्हणून बोलण्यास प्रारंभ करा !,
सणाच्या शुभेच्छा मराठीत द्या, (उदा. 'हॅपी दिवाली'च्या ठिकाणी 'शुभ दीपावली' म्हणा !),
तसेच स्वाक्षरी मराठीतून करा !,
नावात इंग्रजी अक्षरांनी आद्याक्षरे न लिहिता, म राठी (मातृभाषेतील) आद्याक्षरे वापरा, (उदा. श्री. भूषण विश्वनाथ पाटील, यांचे नाव 'श्री. बी.व्ही. पाटील', असे न लिहिता 'श्री. भू.वि. पाटील', असे लिहा !) मुलांना 'हॅरी पॉटर' वाचायला न देता 'पंचतंत्रा'तील कथा वाचायला द्या !,
अशा प्रकारे प्रयत्न आपण मराठी लिहिताना, वाचताना करू शकतो. तसेच आपल्या दारावर पाटीही आपण मराठीत लावूया.

संभाषण, नोंदी आणि लेखन यांसाठी मराठीचा वापर करा ! - 'अनेक मराठी भाषिक मराठी आणि हिंदी भाषा येत असतांनाही एकमेकांशी इंग्रजीतून बोलतात. जेथे मराठी किंवा हिंदी भाषा समजत नसेल, येत नसेल आणि त्यामुळे संवाद साधतांना अडचण येत असेल, तेथेच इंग्रजीचा वापर करावा. जेथे अशी अडचण नसेल, तेथे स्वभाषेचा अभिमान जागृत ठेवण्यासाठी म राठीतच संवाद साधावा.' - कु. मधुरा भोसले, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा.

'दूरध्वनी केल्याची नोंद करतांना किंवा कार्यालयातून बाहेर जातांना नोंद करतांना संबंधित नोंदवहीत स्वतःच्या नावासह अन्य माहिती भरतांना प्रयत्नपूर्वक मराठीतून लिखाण करावे. हल्ली इंग्रजी लेखनाच्या सवयीमुळे मराठीत लिहितांनाही इंग्रजीप्रमाणे म्हणजे रेषेच्या वर लिहिले जाते. ते अयोग्य आहे. म राठी लेखन किंवा नोंदी कागदावर असलेल्या रेषेखाली कराव्यात. त्याचप्रमाणे प्रत्येक शब्दावर शीर्षरिषाही द्यावी. रेषेखाली लिहिलेल्या अक्षरांना रेषेचा आधार मिळतो.

निधर्मीवाद्यांच्या शिकवणुकीमुळे सध्या स्वतःच्या वा अन्य कोणाच्या नावामागे 'श्री.' लावायची पद्धत बंद पडली आहे. 'श्री'ने युक्त तो 'श्रीयुत', असा त्याचा अर्थ आहे. दारावरील पाटी, गणवेशावरील नामपट्टीका, वर्तमानपत्रांतील नावे, लेटरहेड, व्हिजीटींग कार्ड, पत्रे, आवेदने (अर्ज), निवेदने इत्यादी ठिकाणी आपल्या नावामागे 'श्री., कु., सौ. किंवा श्रीमती' लावावे. मुलांच्या नावामागे 'चि. / कु.' लावावे.' - श्री. संजय मुळ्ये, रत्नागिरी.

**स्वतःच्या आणि दुसर्यांच्या नावाचा आदर करण्यास शिका आणि त्यांचा योग्य उच्चार करा !**

'भारतीय आणि विशेषतः हिंदू एकमेकांचा उल्लेख करतांना नावाचा अपभ्रंश करतात, उदा. एखाद्याचे नाव 'व्यंकटेश' असल्यास त्याला 'वेंकी' म्हणणे, 'नारायण' असल्यास 'नार्या' म्हणणे इत्यादी. हिंदू त्यांच्या मुलांची नावे ठेवतांना बहुतेक वेळा देवतांची नावे ठेवतात. नावांचा अशा प्रकारे अपभ्रंश केल्याने संबंधित देवतेचा अपमान होतो आणि नावाच्या उच्चारातून सात्त्विक स्पंदनांची निर्मिती होण्याच्या ठिकाणी त्रासदायक स्पंदनांची निर्मिती होते. अयोग्य नामोच्चारातून देवतांचा होणारा अनादर टाळण्यासाठी आणि योग्य नावाच्या उच्चारातून सात्त्विकतेचा लाभ घेण्यासाठी स्वतःच्या आणि दुसर्यांच्या नावाचा आदर करण्यास शिका आणि त्यांचा योग्य उच्चार करा.' - कु. मधुरा भोसले, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा.

**इंग्रजी भाषेचा परिणाम मराठी भाषेतील लिखाणाच्या पद्धतीवर होणे टाळा !**

संस्कृत भाषा ही देववाणी असल्याने तिच्यात सर्वांत जास्त चैतन्य आहे. संस्कृतनंतर सर्व भाषांत मराठी भाषा जास्त सात्त्विक आहे. सध्या शिक्षण आणि शासकीय कामकाज यांमध्ये जास्त करून इंग्रजी भाषाच वापरली जात असल्याने मराठी बोलतांना आपण इंग्रजी भाषेतील शब्द कळत-नकळत बोलून जातो. मराठी बोलतांना जसे आपण इंग्रजी शब्द वापरतो, तसे मराठी लिहितांनाही इंग्रजी लिखाणाची पद्धत वापरतो. मराठी भाषा अशुद्ध व्हायला तेही एक कारण आहे. भाषाशुद्धीची चळवळ मराठी माणसाने मराठीत बोलावे आणि मराठी बोलतांना इंग्रजी शब्द वापरू नयेत इथपर्यंतच मर्यादित ठेवून चालणार नाही, तर 'मराठी लिहितांना इंग्रजी पद्धतीने वाक्यरचनाही करू नये', असेही सांगायला हवे.

**दिनांक लिहितांना मराठी कालगणनेचा वापर करा !**

'आपल्यावर इंग्रजी कालगणनेचा इतका प्रभाव पडला आहे की, कोणी सध्या मराठी मास कोणता आहे, हे विचारले, तर आपल्याला पटकन सांगता येत नाही. काही हिंदूंची तर मराठी मास ओळीने आणि पूर्ण सांगता येतील कि नाही, अशी स्थिती आहे. त्यामुळे तिथी आणि पक्ष सांगणे तर दूरच राहिले. विज्ञानानुसार परीपूर्ण अशा आपल्या कालगणनेचा वापर आपण केवळ वाढदिवस तिथीनुसार साजरे करण्यासाठी न करता जीवनाच्या प्रत्येक अंगात केला पाहिजे. त्याचा प्रारंभ करण्यासाठी आणि आपल्यात हिंदु संस्कृतीचा अभिमान निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रथम मराठी कालगणनेप्रमाणे दिनांक लिहायचा प्रयत्न केला पाहिजे. फारतर इतरांना कळावे म्हणून कंसात इंग्रजी दिनांक लिहावा आणि एकदा मराठी कालगणना रुळली की, तेही लिहू नये.

**मराठीत अर्थहीन शब्द वापरू नका !**

'टेलिफोन'ला मराठीत 'दूरध्वनी' म्हणतात; टेलिफोनमधून केवळ दूरचा ध्वनी ऐकू येणे, एवढेच नसते, तर संभाषण ऐकू येते. या संदर्भात हिंदीतील 'दूरभाष' हा शब्द जास्त योग्य आहे; कारण टेलिफोनद्वारे दूरचे भाषण, संभाषण ऐकू येते. मराठीत 'भावगीत' हा शब्द प्रचलित आहे. त्या गीतांत भक्तीभाव इत्यादी काही नसून केवळ भावना असतात. त्यामुळे त्यांना 'भावगीत'पेक्षा 'भावनागीत', म्हणणे जास्त योग्य ठरेल. म राठीत 'शस्त्रक्रिया' हा शब्द प्रचलित आहे. क्रिया आपोआप होतात. शस्त्रक्रिया आपोआप होत नाही, तर ती करावी लागते, म्हणजे ते कर्म असते; म्हणून 'शस्त्रक्रिया'पेक्षा 'शस्त्रकर्म' म्हणणे योग्य आहे. प्रत्येक शब्द हा मंत्राच्या क्षमतेचा असल्याने त्याचा वापर योग्य प्रकारेच करणे आवश्यक आहे.' - परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले

**भाषा जवळीकता साधण्यास साहाय्य करते !**

'मातृभाषेद्वारे मिळालेल्या ज्ञानाद्वारे माणसाला जग, समाज आणि राष्ट्र यांचे ज्ञान मिळते. ऋषीमुनींनी दिलेल्या अमृतमय ज्ञानाला घेऊन 'मी कोण, कशा रीतीने दीर्घायुष्य घालवले पाहिजे आणि त्याचा उपयोग कसा समर्थतेने करून घेतला पाहिजे', हे समजून घ्यावे. यामुळे तो स्वतः समृद्ध होऊन समाज आणि राष्ट्र यांना समर्थ होण्यास हातभार लावू शकतो अन् आपले जीवन आनंदात घालवू शकतो. माणसाला आईकडून मातृभाषा सहज मिळालेली असते. तो आपले विचार आणि मनन मातृभाषेत चांगल्या रीतीने करून आपली प्रगती करू शकतो. भाषा एकात्मभाव आणि जवळीकता साधण्यास साहाय्य करते.' - प.पू. परशराम माधव पांडे महाराज

मराठी भाषिकाने माझी भाषा टिकवण्याचे दायित्व माझेही आहे, याचे भान ठेवून आपला भाषाभिमान सतत जागृत ठेऊया आणि संघटितपणे 'मराठी'चे रक्षण तसेच संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध होऊया.

# गोंदी पोलीस आणि आपुलकी बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून ताटातूट झालेल्या मनोरुग्णाला मिळाला कुटुंबाचा आधार

**जालना । प्रतिनिधी -** मुलं चोरुन नेणारा चोरटा म्हणून नागरिकांनी एका परप्रांतीयाला पोलिसाच्या स्वाधीन केलं होतं. परंतु, पोलिसांनी केलेल्या तपासात तो मनोरुग्ण असल्याचं समोर आलं. त्यामुळे गोंदी सदरील मनोरुग्णाच्या नातेवाईकांचा शोध घेऊन मनोरुग्णाला नातेवाईकांच्या स्वाधीन केलं. त्यामुळे मनोरुग्णाला कुटुंबीयांचा आधार मिळाला आहे.

मागील १८ महिन्यापासून ओरिसा येथून बेपत्ता असलेल्या मनोरुग्णाला गोंदी पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस आणि आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्राच्या वतीने आज त्याच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आलय. विशेष म्हणजे लहान मुले पळवणारा व्यक्ती या अफवेतून शाहगड येथील नागरिकांनी पकडून त्याला गोंदी पोलिसांच्या स्वाधीन केलं होतं. मात्र गोंदी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांच्या विशेष प्रयत्नातून ही व्यक्ती अखेर त्याच्या कुटुंबीयाकडे परत गेली आहे.

दोन दिवसापूर्वी शहागड येथील लहान मुलांना पळवणारा माणूस म्हणून तेथील नागरिकांनी एका व्यक्तीला ताब्यात घेऊन पोलिसांच्या स्वाधीन केलं होतं. मात्र पोलिसांनी चौकशी केल्यानंतर संबंधित व्यक्ती ही मनोरुग्न असून ती ओडिसा येथील असल्याच समोर आल होत. त्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांनी ओरिसा येथील पोलिसांशी संपर्क साधला.



ओरिसा येथील पोलिसांनी त्याच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून दिल्यानंतर या मनोरुग्णाला जालना येथील आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र दाखल करण्यात आलं. विशेष म्हणजे या निवारा केंद्रात असतानाही त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आज दुपारी गोंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बालाजी पद्मने, स्थानिक गुन्हे शाखेचे रामप्रसाद पहुरे, सतीश श्रीवास यांनी आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र येथे धाव घेतली. त्यानंतर मनोरुग्ण असलेला मंगू बसंतीया याला त्याचे काका आणि भावाच्या स्वाधीन करण्यात आलं. यावेळी आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्राचे संचालक अरुण सरदार आणि वैशाली सरदार यांची देखील उपस्थिती होती. ही कारवाई पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

जिल्हास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण संपन्न

# तज्ज्ञांकडून नवीन शैक्षणिक धोरणावर मार्गदर्शन




**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी** - राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता विषयक विविध उपक्रम ंची अंमलबजावणी सुरु आहे. त्यासाठी शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावरील शिक्षकांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक सक्षमीकरण तसेच पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व घटकांचे प्रशिक्षण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या मार्फत आयोजित करण्यात येत आहेत. राज्यस्तरावर जिल्ह्यातील तज्ज्ञांनी प्रशिक्षण घेऊन जिल्हास्तर व तालुकास्तर अंमलबजावणी होत असते.

जिल्हास्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालनाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे व प्रशिक्षणाचे जिल्हा समन्वय डॉ. श्रीहरी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमि क माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी शिक्षक क्षमतावृद्धी शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण अंतर्गत इ.१ ली ते ५ वी तसेच इ.६ वी ते ८ वी आणि इ.९ वी ते १२ वी इयत्तांना शिकविणाऱ्या सर्व शिक्षकासाठी आणि पर्यवेक्षकीय यंत्रणेसाठी शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.0 सर्व जिल्हाभर राबवल्या जाणार आहे. याचे नियोजन, डायट प्राचार्य म्हणून मी स्वतः, श्री कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्रा), मंगला धुपे शिक्षणाधिकारी (माध्य) व तालुक्याचे सर्व गटशिक्षणाधिकारी सर्वांच्या सहकाऱ्यांनी झालेले आहे.

प्रशिक्षण २.0 या प्रशिक्षणाचे दि. ४ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी या कालावधीत अमित हॉटेल जालना या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. येथे प्रत्येक तालुक्यातून किमान १८ तालुकास्तरीय प्रशिक्षक शिक्षक उपस्थित होते. या प्रशिक्षणाम डॉ राजेंद्र कांबळे प्राचार्यः जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना यामध्ये पुढील विषयांचा समावेश होता. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत शिक्षण) २०२३, राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (एसक्यूएएएफ), राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात येणाऱ्या काळातील येणारी आव्हाने ओळखून नवनवीन संधी उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांना कुशल बनविण्याची रचना करण्यात आलेली आहे. त्यासाठी शाळेत अध्यापन करणारा शिक्षक अधिक सक्षम असला पाहिजे. त्यास व्यावसायिक विकासाच्या संधी उपलब्धतेसाठी हे प्रशिक्षण अतिशय उपयुक्त ठरणार आहे. याचा उपयोग करून प्रत्येक मूल वेगळे आहे हे समजून घेऊन त्याच्या क्षम तांचा कौशल्याचा पायाभूत स्तरापासून विकास करण्यासाठी वर नमूद सर्व घटक उपयोगी पडतील. उपस्थित सर्वच सुलभकांनी आपापले विषय अतिशय सुलभपणे मांडणी करून विस्तृत माहिती दिली. शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.0 अतिशय दर्जेदार असून जिल्हास्तरावर पाच दिवसाचे नियोजन जिल्हा समन्वयक डॉ. श्रीहरी दराडे यांनी अतिशय उत्तम पद्धतीने केले. या प्रशिक्षणात घेतलेले विषय नवीन असून ते शिक्षक म्हणून आम्हाला अतिशय उपयुक्त आहेत.

क्षमताथारित्त मूल्यांकन संकल्पना व कार्यनीती, क्षमताधारित अध्ययन अध्यापन प्रक्रिया, क्षमताधारित प्रश्ननिर्मिती, उच्च विचारप्रवर्तक प्रश्न (एचओटी), अध्ययन निष्पत्तीनुसार प्रश्ननिर्मिती, समग्र प्रगतीपत्रक (आयएचपीसी) संकल्पना व स्तरनिहाय स्वरुप, इत्यादी विषय घेण्यात आले. या प्रशिक्षणाला प्रमुख सुलभक म्हणून डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता संजय येवते, डॉ. प्रमोद कुमावत, अधिव्याख्याता डॉ. श्रीहरी दराडे, योगेश्वर जाधव भारत सूर्यवंशी, प्रेरणा मोरे, सय्यद अख्तर, निलोफर पटेल, केंद्रप्रमुख सुजाता भालेराव, प्रा दत्ताजीराव देशमुख, डॉ. करुणा हिवाळे, डॉ. शिवनंदा मेहेत्रे, विवेक कुलकर्णी, प्रदीप घाटेशाही, डॉ. आनंदराव जाधव, हरिभाऊ निकम, गणेश खरात यांनी मार्गदर्शन केले.



**जालना शहर महानगरपालिका कार्यालयात संत रविदास यांच्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी परिवर्तन असंघटित कामगार संघांचे प्रदेश अध्यक्ष तथा जालना जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभाग शहराध्यक्ष दिनकर घेवंदे, मनपाचे प्रशासकीय अधिकारी श्री. फुलंब्रीकर, राजेश कुरलीये, जोगी, आनंद मोहिदे आदी.**

# कोषागार विभागाचे निवृत्तीवेतनधारकांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** लेखा व कोषागारे संचालनालय तसेच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व सर्व कोषागार कार्यालयाकडून निवृत्ती वेतन सुरु करणे, निवृत्ती वेतन बंद करणे निवृत्तीवेतन फरक अदा करणे अथवा अतिरीक्त रक्कम वसूल करणेच्या अनुषंगाने राज्यातील कोषागार कार्यालयामार्फत फोन अथवा मोबाईलद्वारे निवृत्तीवेतनधारकांना कळविले जात नाही. तसेच व्हॉटस अॅपद्वारे अथवा इतर सोशल मिडियावरुन निवृत्तीवेतन बंद होऊ नये. याकरीता लिंक ओपन करुन फॉर्म भरण्याबाबत कळविले जात नाही. तसेच कोषागार कार्यालयामार्फत कोणत्याही कर्मचाऱ्यांस निवृत्तीवेतनधारकाच्या घरी पाठविले जात नाही. कोषागारामार्फत करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांकरीता पत्रव्यवहार केला जातो. तरी सर्व निवृत्तीवेतनधारकांनी ऑनलाईन रक्कम अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी पंजाब पुंडगे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# सोमवारी लोकशाही दिनाचे तहसील कार्यालयात आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** सामान्य प्रशासन विभागाने तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे तिसऱ्या सोमवारी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने तहसील कार्यालय जालना येथे तालुकास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनासाठी अर्जदारांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतित पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवून देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. लोकशाही दिनात न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व व अपील, सेवाविषयक आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी या पुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल तसेच ज्यांनी यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतू अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करू नये.

लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज https://jalna.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. असेही कळविले आहे.

## वेबसाईट मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने सीसीआयची कापूस खरेदी बंद

**जालना -** वेबसाईट मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने जालन्यात सीसीआय केंद्राची कापूस खरेदी बंद झालीय. यामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत. सीसीआय कापूस खरेदी केंद्राच्या अधिकाऱ्यांनी जालना कृषी उत्पन्न बाजार समितीला पत्र देऊन पुढील आदेश पर्यंत कापूस खरेदी बंद असेल असं कळवलं आहे. वेबसाईट सुरू होत नाही, तो पर्यंत शेतकऱ्यांनी कापूस सीसीआय केंद्रावर आणू नये.

# महापुरुषांविषयी अशोभनीय वक्तव्य केल्याप्रकरणी राहुल सोलापुरकर यांच्यावर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार कारवाई करा

चंद्रकांत रत्नपारखे यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महापुरुषांविषयी अत्यंत अश्लिल व अशोभनीय वक्तव्य केल्याप्रकरणी अभिनेता राहुल सोलापुरकर यांच्यावर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार कारवाई करावी व त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी जालना जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन शासकीय समिती सदस्य चंद्रकांत नाथराव रत्नपारखे यांनी जालना जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अभिनेता राहुल सोलापुरकर नावाच्या इसमाने छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेउकर या दोन महापुरुषांविषयी अत्यंत अश्लिल व अशोभनीय वक्तव्य केले आहे. त्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यांच्या वक्तव्यामुळे दंगलीची परिस्थिती तयार निर्माण झाली आहे. व अनुसूचित जातीच्या लोकांच्या मनाला पिडा झाली आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात अॅट्रॉसिटी कायद्यानुसार कारवाई करून त्यास तात्काळ अटक करण्यात यावी.

महापुरुषांच्या अवमानाची राज्यात मालिका सुरु झाली आहे. त्या प्रकरणी राज्य सरकारने श्वेतपत्रिका काढावी व ती जनतेत प्रकाशित करावी व आतापर्यंत जे अवमानाचे प्रकार झाले आहेत. त्याप्रकरणी सरकारने काय कार्यवाही केले आहे? त्याची माहिती सरकारने जनतेस द्यावं, सततच्या असंसदीय वक्तव्यामुळे समाजात तेढ निर्माण होत आहे. त्यामुळे अशांविरोधात उपाययोजना म्हणून सरकारने महामानव सन्मान व अवमान विरोधी कायदा करावा व तो कायदा हा देशद्रोह या कलमात जोडावा अशी मागणी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

निवेदनावर महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शेषराव जाधव, जालना जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन शसकीय समितीचे सदस्य चंद्रकांत रत्नपारखे, अच्युतराव मोहिते, भाऊसाहेब रत्नपारखे, दिग्विजय धांडगे, दिलीप गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# डॉ.होमीभाभा यंग सायंटिस्ट अवॉर्ड परीक्षेत पीएमश्री जिप प्र शाळेचे यश

**परतूर । प्रतिनिधी -** या वर्षी नुकत्याच झालेल्या डॉ.होमी भाभा यंग सायंटिस्ट अवॉर्ड परीक्षेत इयत्ता ९ वी मधून ६ विद्यार्थी प्रॅक्टिकल राऊंड ला र्रिश्रळषळशव झाले होते त्या पैकी ४ विध्यार्थी अजय पद्माकर गोरे. वैष्णवी तुकाराम अंभोरे. श्रीपाल संतोष खरात. पार्थ अंकुश कोल्हे. या चार विद्यार्थ्यांची प्रबंध लेखन व व्हाय वा साठी निवड झाली असून त्यांना कोणते तरी एक मेडल अवश्य मिळणार आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दया काटे. भगवानराव मोरे. व शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक, गणेश राठोड.व सर्व शिक्षक वृंद. शालेय स्पर्धा परीक्षा प्रमुख एस.व्ही.नाईक यांनी शुभेच्छा देवून विशेष अभिनंदन केले.



याप्रसंगी पी एम श्री जिल्हा परिषद प्रशालाचे मुख्याध्यापक, राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले मागील वर्षी ही याच परीक्षेत विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले होते यामध्ये कार्तिक रामेश्वर दिरंगे. व पुनम लक्ष्मण भुंबर या विद्यार्थ्यांनी काश्य मेडल, सिल्वर मेडल, असे दोन मेडल प्राप्त केले होते. त्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द व शिक्षकांचे मार्गदर्शन हे त्यांना लाभले आहे. यावेळी विद्यार्थी व पालकांची उपस्थिती होती.

# मोटार सायकलच्या पसंती क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** नॉन ट्रान्सपोर्ट टु व्हीलर मोटार सायकल नोंदणी मालिका एमएच २१ सी ई- ही सद्यस्थितीत सुरु असून या मालिकेतील क्रमांकाचे वाटप पूर्ण होत आहे. जिल्ह्यातील नॉन ट्रान्सपोर्ट टु व्हीलर मोटार सायकल वाहनांसाठी एमएच- २१ सी एफ 000१ ते ९९९९ ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. तरी ज्या वाहनधारकांना आपल्या दुचाकी वाहनासाठी पसंतीचा क्रमांक घ्यावयाचा आहे अशा व्यक्तींनी दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्जासोबत राष्ट्रीयकृत बँकेचा मुळ किमतीचा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट, ओळखपत्राच्या (आधारकार्ड) छायांकित प्रतिसह (स्वयंसाक्षांकीत), पॅनकार्ड व दुरध्वनी क्रमांकासह उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना कार्यालयात अर्ज जमा करावा. नवीन मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप 'महाराष्ट्र मोटार वाहन नियम' व परिवहन आयुक्तांचे परिपत्रकानूसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी अनेक अर्जदारांनी अर्ज केल्यास त्यासाठी विहीत पध्दतीने लिलावाची प्रक्रीया अवलंबिण्यात येईल. एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज आलेले असतील तर एका क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त आलेल्या अर्जदारांनी वाढीव रकमेचा एक धनाकर्ष आणणे आवश्यक आहे. पहिला धनाकर्ष मुळ किंमतीचा व दुसरा धनाकर्ष आपण लावलेल्या बोलीच्या वाढीच्या रकमेचा असावा. धनाकर्ष विहीत शुल्कापेक्षा सर्वात जास्त रकमेचे ज्यांचे असतील त्यांनाच हा क्रमांक आरक्षित करुन दिला जाईल. सर्व संबंधितांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांच्या नावावर आपले धनाकर्ष बंद लिफाफ्यात दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १ वाजेपर्यंत सादर करावेत. वेळेनंतर कोणत्याही सबबीवर धनाकर्ष जमा करुन घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच दुपारी ३ वाजता बंद लिफाफे उघडण्यात येतील. त्यावेळी सर्व संबंधितांनी उपस्थित राहावे.

# जालन्यात रविवार रोजी मोफत मधुमेह निदान उपचार व मार्गदर्शन शिबीर

**जालना । प्रतिनिधी -** छाबडा हॉस्पीटल जालना, लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चेंट सिटी व रेड स्वस्तिक सोसायटी जालना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ फेब्रुवारी २०२५,रविवार रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत मोफत मधुमेह (डायबेटीज) निदान, चिकित्सा, उपचार व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन छाबडा हॉस्पीटल मोदीखाना,संतोषवाडी समोर जालना येथे करण्यात आले आहे.



छाबडा हॉस्पीटलच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील शिबीर मोफत घेण्यात येणार आहे.

शिबीरात मधुमेह तज्ञ डॉ. धीरज छाबडा आणि डॉ. सौ तरुणा छाबड़ा रुग्णांची तपासणी करून निदान करतील. या शिबिरात रुग्णांची संपूर्ण शारिरीक तपासणी व उपचारा बाबत निर्णय, सिनेमा स्लाईडस द्वारे रुग्ण शिक्षण, प्रश्नांची उत्तरे व शंकाचे निरासन, आहार व व्यायाम विषयक मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जालना शहरात २५ वर्षे आरोग्याच्या क्षेत्रात कार्यरत असलेले छाबडा हॉस्पीटल जालना नेहमीच समाजकारणासाठी कटिबद्ध आहे.

रुग्णांनी येतांना उपाशी पोटी येणे आवश्यक आहे तसेच येतांना आपले सर्व जुने रिपोर्टस् सोबत आणावे. शिबीरासाठी नांव नोंदणी दि.१३ ते १५ फेब्रुवारी २०२५, शनिवारपर्यंत छाबडा हॉस्पीटल मोदीखाना, संतोषवाडी समोर येथे सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू राहील. नाव नोंदणीसाठी फोन ०२४८२-२३८५६७,०२४८२-२४३२००, मो. ९४२२३४५१९३ यावर संपर्क करावा. प्रथम येणार्या १०० रूग्णास प्राधान्य देण्यात येईल. तरी गरजूंनी त्वरित नांव नोंदणी करावी असे आवाहन जालना लॉयन्स क्लब ऑफ जालना मर्चट सिटीचे अध्यक्ष लॉ. पवन देशमुख, सचिव लॉ. आनंद वाघमारे, कोषाध्यक्ष लॉ. सुनिल भगत, रेड स्वस्तिक सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र अग्रवाल, सचिव मोहन शिंदे, कोषाधयक्ष रमेश देहेडकर, डॉ. धीरज छाबडा व डॉ तरुणा छाबडा यांनी केले आहे.

# बाजारात मिरचीची आवक वाढली, भाव गडगडले

## मिरची उत्पादक शेतकरी चिंतेत



**जालना । प्रतिनिधी -** जालन्याच्या बाजारात बुधवार (दि १२) रोजी अचानकपणे मिरचीची आवक वाढली. आवक वाढल्याने मिरचीचे भाव गडगडले आहेत. त्यामुळे मिरची उत्पादक शेतकरी चिंतेत पडले आहेत.

गेल्या वर्षी मिरचीला २५ ते २८ हजार रुपये प्रति क्विंटल असा भाव मिळाला होता. मात्र, यावर्षी बाजारात मिरचीची आवक वाढल्याने मिरचीच्या भावात मोठी घसरण झाली असून १० ते १२ हजार रुपये प्रति क्विंटल भावाने मिरचीची विक्री होत आहे. त्यामुळे मिरची लागवडीचाही खर्च निघत नसल्याचे मिरची उत्त्पादक शेतकरी सांगत आहेत. यामुळे हा शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. दरम्यान, मिरचीचे भाव सुधारावे अशी अपेक्षा जालन्यातील काही मिरची उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# पाणीवेस येथील अतिक्रमणावरील करवाईवरून पालिका आयुक्त - पोलिसांमध्ये जुंपली!

## रिकाम्या हाताने अतिक्रमण पथकासह पोलिसही फिरले माघारी

**जालना । प्रतिनिधी -** शहरात सध्या महापालिकेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम सुरू आहे. जालना महापालिकेचे अतिक्रमण हटाव पथक हे बड्या लोकांचे अतिक्रमण काढणे सोडून गरीबांच्या मागे लागतात असा सुर जालनेकरांच्या मनात उमटत आहेत. जालना महानगरपालिका आणि पोलीस यांच्यावतीने ही संयुक्त कारवाई सुरू आहे.



महापालिकेचे अतिक्रमण हटाव पथक आणि पोलीस यांच्यावतीने ही संयुक्त कारवाई सुरू आहे. मात्र आज पाणीवेस परिसरात अतिक्रमण हटवण्याची कारवाई सुरू असताना एका अतिक्रमण धारकाचे पत्र्याचे शेड पाडण्यात आले.यावेळी हे शेड हटवू नये म्हणून अतिक्रमण धारक थेट पाडून टाकलेल्या पत्रामध्ये जाऊन लपला आणि त्याने पत्र्याने गळा चिरून घेण्याची धमकी दिली.

जेसीबीच्या सह्याने एका अतिक्रमण धारकाचे पत्र्याचे शेड पाडण्यात आले. यावेळी हे शेड हटवू नये म्हणून अतिक्रमण धारक थेट पाडून टाकलेल्या पत्रामध्ये जाऊन लपला. त्याने पत्र्याने गळा चिरून घेण्याची धमकी पथकाला दिलीय. पथकाने त्याला गुन्हा दाखल करण्यात येईल असे सांगितले तरीही अतिक्रमण धारक मागे हटला नाही. त्याच्या भूमिकेवर तो ठाम होता. बघ्याची गर्दी जमली होती. पोलीस हैराण झाले होते करावे तरी काय हा यक्ष प्रश्न सर्वांसमोर पडला होता. एकट्या अतिक्रमन धारकांसमोरं पालिकेचे पथक नमले. अखेर अतिक्रमण हटाव पथकाने महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांना फोन करून या घटनेची सविस्तर माहिती दिली. यावेळी आयुक्तांनी फोनवरून पोलिसांना पत्र्यात लपलेल्या अतिक्रमण धारकांवर कारवाई करून त्याला उचलण्याच्या सूचना पोलिसांना दिली. .मात्र आधी पोलीस ठाण्यात तक्रार द्या मगच कारवाई करू असे पोलिसांनी सांगितले.

महापालिका आयुक्त संतोष खांडेकर व पोलिसांमध्ये फोन करून पंधरा मिनिट पान २ वर




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.